**नियमित दिवाणी दावा १६९/२०२२**
**निशाणी क्र.४०/क सोबत**

**प्रतिवादी तर्फे वकील श्री.एन.ए वणकुद्रे यांचे तर्फे उलटतपास सुरु —**

माझे शिक्षण ७ वी झाले आहे. माझे लग्न सन १९८४ मध्ये झाले आहे. बाळाप्पा बसाप्पा कल्लोळी यांना कोणी वारस नाही. वादी क्र.३ बसव्वा माझी चुलत सासु आहे. माझे सासरे आण्णाप्पा शेती करत होते. माझे दीर राजाराम मुंबईहून येवून जावून शेती करतात. राजाराम मुंबई येथे हॉटेलमध्ये काम करतात. मला दोन मुले व एक मुलगी आहे. माझा एक मुलगा वारला आहे. एक मुलगा मुंबई येथे हॉटेलमध्ये काम करतो, व मुलगी विवाहीत आहे. बाबुराव यांचे शिक्षण काय झाले हे मला माहित नाही. बाबुराव माझे सासरे असल्याने त्यांचे शिक्षण काय झाले हे मला माहित नाही. ते शिक्षक होते. त्यांनी शिक्षक म्हणून कोठे नोकरी केली ते मला माहित नाही. मला त्यांचा पगार माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे दीर राजाराम कायमपणे मुंबई येथे असतात. राजाराम हे त्यांच्या उत्पन्नापैकी रक्कम मला देत नाहीत. बसव्वा यांचे वारस मला त्यांच्या उत्पन्नापैकी काही रक्कम देत नाहीत. माझे लग्न झाल्यापासून बाबुराव यांनी त्यांचे भाउ व वादी यांना पैसे दिले नाहीत.

माझे सासरे आण्णाप्पा यांचे वडील बसाप्पा यांना भाउ होते का ते मला माहित नाही. माझे सासरे आण्णाप्पा व त्यांचे भाउ बाळाप्पा, शिवाप्पा व बाबुराव यांना वडीलोपार्जीत घर मिळकत व शेत मिळकत मिळाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आण्णाप्पा व त्यांचे भाउ यांनी वडीलोपार्जीत मिळकतीचे वाटप करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आण्णाप्पा यांना वाटपात हिडदुगी येथील गट क्र.५४४ शिवाप्पा, गट क्र.५४५ आण्णाप्पा, गट क्र.५४६ बाळाप्पा, गट क्र.५४७ बाबुराव, यांना वाटपात मिळाला होत्या.

प्रतिवादीचे वकीलाचे विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करणेत आला.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक ०४/०४/२०२५

डी.एम. पवार
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज

**प्रतिवादी तर्फे वकील श्री.एन.ए वणकुद्रे यांचे तर्फे उलटतपास सुरु —**

११. हे म्हणणे खरे आहे की, वडीलार्जित मिळकती ज्या वाटपात आल्या त्यांना स्वतंत्र नांव सात बारा उता—यावर लागले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे त्यांची स्वतंत्र कब्जेवहीवाट आहे व त्याप्रमाणे ते पिके घेतात. ही नांवे सन १९६० साली फेरफार क्रमांक १३७३ ने लागली याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्याची शेतजमिन आहे त्याला शेतसारा तहसिलदार कार्यालयात किंवा तलाठयाकडे भरावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, जो तो आपल्या गट क्रमांकाचा शेतसारा भरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिवाप्पाने गट क्रमांक ५४४ मधील क्षेत्र विक्री केले आहे. ते क्षेत्र विक्री करताना आण्णाप्पाची मान्यता घेतली होती का हे मला माहित नाही. विक्री करून जो मोबदला आला त्यामधील रक्कम आम्हाला दिली नाही. आम्ही त्या मोबदल्याची रक्कम मागणी केली असे झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, बाळाप्पाच्या गट क्रमांक ५४६ मधील वीस गुंठे क्षेत्र आण्णाप्पाने खरेदी केले आहे व त्या क्षेत्रास आण्णाप्पाच्या नांवाची नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ५४६ मधील क्षेत्र बाळाप्पाने इतर लोकांना देखील विक्री केले आहे. आण्णाप्पा, शिवाप्पा, बाळाप्पा व बाबूराव यांना दोन बहिणी होत्या. त्या मयत झाल्या आहेत. त्या दोघींचे सासर मला माहित नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की, वडिलार्जित आलेल्या घर मिळकतींना आण्णाप्पा, शिवाप्पा व बाळाप्पा यांच्या नांवाची नोंद झाली. बाबूरावचे घर व आमचे वडीलार्जित मिळालेले घर एकाच गल्लीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वडीलार्जित घर मिळकतीत बाबूराव व त्यांची आई सत्यव्वा कधीच रहायला नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, बाबूराव त्यांनी खरेदी घेतलेल्या मिळकतीत रहात होते. हे म्हणणे खरे आहे की, वारसाने आलेली घर मिळकत हिडदुगी गावात मध्यावर आहे. हे म्हणणे खरे आहे

की, बाळाप्पाची घर मिळकत आण्णाप्पाने खरेदी घेतली आहे. त्या मिळकतीचा घर क्रमांक मला सांगता येणार नाही. आमच्या वडीलार्जित घराचा मिळकत क्रमांक माझया लक्षात नाही. मला बाळाप्पाच्या वडीलार्जित घराचा मिळकत क्रमांक सांगता येणार नाही. शिवाप्पाच्या वडिलार्जित घर मिळकतीस त्यांच्या वारसांच्या नांवाची नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आण्णाप्पाच्या पश्चात आमच्या घरास चंद्रकांत व राजाराम यांच्या नांवाची नोंद झाली. हे म्हणणे खरे आहे की, चंद्रकांत व राजाराम यांच्या नांवाची स्वतंत्र नोंद ग्रामपंचायत सदरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, चंद्रकांत यांच्या पश्चात माझया नांवाची नोंद घर मिळकतीस झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, या घर मिळकतीत प्रत्येकाचे विज बील स्वतंत्र येते.

१३. प्रतिवादी क्रमांक १ यांचे शिक्षण काय झाले व ते काय काम करतात हे मला माहित नाही. आण्णाप्पा यांचे शिक्षण किती झाले होते ते मला माहित नाही. आमच्या एकत्र कुटुंबाचा कर्ता आण्णाप्पा कल्लोळी हे होते. तसा पुरावा या कामी हजर केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचे एकत्र कुटुंब होते हे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९६० मध्ये बाळाप्पा, शिवाप्पा, आण्णाप्पा व बाबूराव यांचेमध्ये वाटप झाले होते.

१४. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या चतु:सिमा नमुद केल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, चतु:सिमा नमुद करण्यास मला काही अडचण नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची घर मिळकतीत वहिवाट नसल्याने चतु:सिमा नमुद केल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या वर्णनात घर आहे असे नमुद केले नाही, तसेच त्या घराचा ग्रामपंचायत मिळकत क्रमांक नमुद केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसे घर दावा मिळकतीत नाही म्हणून तसे नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत घर आहे असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही.

१५. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ५०७ मध्ये ओढा आहे. हे

म्हणणे खरे आहे की, तो ओढा उत्तर—दक्षिण आहे. ओढा गट क्रमांक ५०७ च्या कोणत्या बाजूस आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यासोबत जोडलेल्या समजुतीच्या नकाशात ओढा दाखविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, समजुतीचा नकाशा चूकीचा आहे.

१६. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ५०७ च्या सातबारा उता—यास बाबूराव यांच्या नांवाची नोंद आहे. मला आता गट क्रमांक ५०७ चा सातबारा उतारा दाखविला. मला स्पष्ट वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आता जो सातबारा उतारा दाखविला त्यावर बाबूराव यांच्या नांवची नोंद आहे. गट क्रमांक ५०७ हा बाळाप्पा चन्नाप्पा कळबसी यांच्या मालकीचा आहे. बाळाप्पा कळबसी हे त्या मिळकतीचे मालक कसे झाले हे मला माहित नाही. तशी माहिती ठेवण्याचा मी प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, बाळाप्पा कळबसी हे बाबूराव व सत्यव्वा यांच्या सोबत रहात होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांची सेवा सुश्रुशा बाबूराव व सत्यव्वा करत होते. बाळाप्पा कळबसी सन १९९० मध्ये मयत झाले. तेंव्हा त्यांचे वय किती होते हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, बाळाप्पा कळबसी यांनी गट क्रमांक ५०७ चे दि.२७.०५.१९७४ रोजी नोंदणीकृत मृत्युपत्र त्यांच्या हयातीत बाबूराव यांच्या नांवे केले होते. हे म्हणणे खरे नाही की, बाबूराव यांनी मृत्यूपत्राच्या आधारे प्रोबेटचा अर्ज केला होता. तो अर्ज न्यायालयाने मंजूर केला होता याबाबत मला माहित नाही. त्याआधारे फेरफार क्रमांक ६३५ मंजूर झाला व बाबूराव यांच्या नांवाची नोंद गट क्रमांक ५०७ ला झाली याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ५०७ मध्ये बाबूराव पिके घेत होते व त्यांची कब्जावहिवाट होती व आहे. गट क्रमांक ५०७ मध्ये बोरला लाईटचे कनेक्शन होते. ते लाईट कनेक्शन बाळाप्पा कळबसी यांच्या नांवाचे आहे. आम्ही त्याचे लाईट बिल भरत आहोत. लाईट बिल भरल्याबाबत पावत्या या कामी दाखल केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही लाईट बिल भरले नाही म्हणून पावत्या हजर केल्या नाहीत.

१७. गट क्रमांक ५०७ ला आमच्या नांवाची नोंद व्हावी म्हणून मी कोणत्याही कार्यालयास अर्ज केला नाही. तसा अर्ज करण्यास मला काही अडचण नव्हती. गट क्रमांक ५०७ च्या मोजणीबाबत किंवा आमची हद्द निश्चीत करण्यासाठी आम्ही अर्ज केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आमची कब्जेवहिवाट नाही म्हणून आम्ही तसा अर्ज केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ५०७ च्या हद्दीप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ ने कुंपन भिंत बांधली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसे काही बांधकाम केले नाही असे मी खोटे सांगत आहे.

१८. प्रतिवादीचे वकीलांनी उर्वरित उलटतपास पुढील तारखेस घेणेबाबत नि.६० वर अर्ज दाखल केला. तो नामंजूर करण्यात आला, तरी प्रतिवादीचे वकील उलटतपास घेणेस तयार नाहीत. म्हणून उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला.

उलटतपास नाही.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक ०८/०४/२०२५

डी.एम. पवार
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज